The People's Education Society's

**JAMKHED MAHAVIDYALAYA, JAMKHED**

Tal. JAMKHED, Dist Ahmednagar Pin - 413201(MS.)

Phone & Fax - 02421 - 221193

NAAC REACCREDITED C GRADE

## दिनांक १७ /१२/ २०२३

## बॉल बॅडमिंटन मध्ये जामखेड महाविद्यालय अव्वल

सकाळ

# बॉल बॅडमिंटनमध्ये जामखेड महाविद्यालय अव्वल



जामखेड : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

▸ सकाळ वृत्तसेवा

जामखेड शहर, ता. १७ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन स्पर्धा जामखेड महाविद्यालयात जल्लोषात पार पडल्या. या स्पर्धेमध्ये जामखेड महाविद्यालय संघ अंतिम विजेता ठरला तर सी. डी. जैन महाविद्यालय श्रीरामपूर उपविजेता संघ ठरला.

जामखेड महाविद्यालयाच्या प्रांगणात बॉल बॅडमिंटनच्या स्पर्धा उत्साह पूर्ण वातावरणात पार पडल्या. अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात जामखेड महाविद्यालयाच्या खेळाडूंनी श्रीरामपूरच्या सी. डी. जैन महाविद्यालयाच्या संघावर मात करून अंतिम सामना विजय संपादन केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहमदनगर जिल्हा क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या अंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन स्पर्धा भरवण्यात आल्या.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थानी, दि पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उद्धव बापू देशमुख होते. स्पर्धेचे उद्घाटन मुख्याधिकारी अजय साळवे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मंडलिक उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष अरुण चिंतामणी, सचिव शशिकांत देशमुख, खजिनदार राजेश मोरे तसेच अहमदनगर जिल्हा क्रीडा विभागाचे सचिव डॉ. राजेंद्र देवकाते उपस्थित होते.

जामखेड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एल. डोंगरे यांनी स्वागत केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव शशीकांत देशमुख यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. या स्पर्धेसाठी तीन मैदाने तयार करण्यात आली होती. राष्ट्रीय खेळाडू धीरज पाटील, प्रल्हाद साळुंखे, पंकज पोकळे, समद शेख, फैयाज शेख, नितीन यादव परीक्षक म्हणून काम पाहिले.

स्पर्धेच्या आयोजनासाठी शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अण्णा मोहिते यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थी यश मिळू शकले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Nagar, Nagar-Today
18/12/2023 Page No. 8